## Marathi

| | |
|---|---|
| **Group Number :** | 19 |
| **Group Id :** | 2268958707 |
| **Group Maximum Duration :** | 60 |
| **Group Minimum Duration :** | 60 |
| **Show Attended Group? :** | No |
| **Edit Attended Group? :** | No |
| **Break time :** | 0 |
| **Group Marks :** | 250 |

## Marathi

| | |
|---|---|
| **Section Id :** | 22689514418 |
| **Section Number :** | 1 |
| **Section type :** | Online |
| **Mandatory or Optional :** | Mandatory |
| **Number of Questions :** | 41 |
| **Number of Questions to be attempted :** | 41 |
| **Section Marks :** | 250 |
| **Maximum Instruction Time :** | 0 |
| **Sub-Section Number :** | 1 |
| **Sub-Section Id :** | 22689528804 |
| **Question Shuffling Allowed :** | No |

**Question Id : 226895695918 Question Type : COMPREHENSION Sub Question Shuffling Allowed : Yes Group Comprehension Questions : No Question Pattern Type : NonMatrix**

**Question Numbers : (976 to 979)**

**भारुड**

आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे रूपकात्मक नाट्यगीत म्हणजे 'भारुड' होय. ही रूपके महालक्ष्मी, भवानी, खंडोबा, बहिरोबा इत्यादी देवतांचे उपासक; महानुभाव, लिंगायत, नाथ इत्यादी पंथाचे अनुयायी; आंधळा, बहिरा, पांगळा, इत्यादी भिक्षेकरी; ज्योतिषी, भटजी, जागल्या इत्यादी व्यावसायिक; डोंबारी, कोल्हाटी, जादुगार, भांड, इत्यादी लोक कलावंत; हुतुतू, टिपरी, भोवरा, पिंगा इत्यादी खेळ; एडका, कुत्रा, बैल, टिटवी इत्यादी पशु – पक्षी यांच्यावर रचलेली आहेत. अशा प्रकारची रचना संत ज्ञानदेव व संत नामदेव या संत एकनाथपूर्व, तशीच संत तुकाराम व संत रामदास इत्यादी एकनाथोत्तर संतांनी केली असली, तरी एकनाथांचीच भारुडे एवढी लोकप्रिय झाली की, भारुडे म्हणजे एकनाथांचीच असा समज रूढ झाला.

बहुरूढ ते भारुड, भराडी जातीचे लोक गातात ते भारुड, 'भारुंड' नावाच्या द्विमुखी पक्षाप्रमाणे द्वयर्थी गीत ते भारुड अशा व्युत्पत्ती सुचविल्या गेल्या आहेत. परंतु त्यातील कोणत्याही व्युत्पत्तीस भरीव आधार नाही. व्यवहारात भारुडाचा अर्थ कंटाळवाणी, निरर्थक बडबड असा आहे. पण तोही कसा आला ते कळत नाही. लौकिक व्यवहारावर आध्यात्मिक वा नैतिक रूपके रचण्याची परंपरा फार प्राचीन आहे. अशी रूपके महाभारतात, भागवतात तशीच लोकगीतात आणि कलगीतुऱ्याच्या शाहिरीत आढळतात.

रूपकाच्या चमत्कृतीने श्रोत्यांचे लक्ष वेधायचे, त्या रूपकाचा उलगडा करण्यात त्यांना गुंतवायचे आणि शेवटी त्यातील आध्यात्मिक–नैतिक आशय त्यांच्या मनात उतरवायचा, हे कार्य अशी रुपके उत्कृष्टपणे करतात. संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय होण्याची कारणे चार, ती म्हणजे भारुडात असणारी विविधता, नाट्यात्मता, विनोद आणि गेयता.

संत एकनाथ हे नित्य नैमित्तिक कर्म आचरणारे आणि सांसारिकांची सुख दुःखे, इच्छा-आकांक्षा, आवडी-निवडी इत्यादी विषयी जिव्हाळा बाळगणारे होते, त्यामुळे सामान्यांच्या लौकिक जीवनाशी ते सहज समरस होत. याच लौकिक जीवनाच्या आधारे सांसारिकांना आध्यात्मिक–नैतिक शिकवण दिली, तर मनोरंजनाच्याद्वारे लोकशिक्षणाचे कार्य साधेल, हाच त्यांचा भारुड रचनेमागील हेतू दिसतो. संत एकनाथांची भारुडे ही विलक्षण नाट्यात्मक आहेत. ती गाताना त्यातील पात्रांची सोंगे आणली जातात आणि प्रसंगानुरूप बतावणी करण्यात येते. 'विंचू चावला' या भारुडाचे लक्ष्य आहे काम-क्रोधाने होणारी मनोवस्था हे; पण त्यात अभिनय आहे तो वृश्चिक दंशाचा. हीच गोष्ट इतर भारुडांची आहे.

**Sub questions**

**Question Number : 976 Question Id : 226895695919 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

भारुड म्हणजे ................................ होय.

1. देवाचा धावा करणे
2. नामजप करणे
3. आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे रूपकात्मक नाट्यगीत
4. पंडिती काव्य रचना

**Options :**
2268952698158. 1
2268952698159. 2
2268952698160. 3
2268952698161. 4

**Question Number : 977 Question Id : 226895695920 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय होण्याचे प्रमुख कारण कोणते?

1. लिखित स्वरूप
2. भारुडातील संगीत
3. विविधता, नाट्यात्मता, विनोद व गेयता
4. भारुडातील सामग्री

**Options :**
2268952698162. 1
2268952698163. 2
2268952698164. 3

2268952698165. 4

**Question Number : 978 Question Id : 226895695921 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

भारुडांचा मुख्य उद्देश कोणता?

1. देवाचे भजन करणे
2. केवळ करमणूक करणे
3. उपजीविकेचे साधन म्हणून वापर
4. मनोरंजनातून लोकशिक्षणाचे कार्य साधणे व समाज प्रबोधन करणे

**Options :**
2268952698166. 1
2268952698167. 2
2268952698168. 3
2268952698169. 4

**Question Number : 979 Question Id : 226895695922 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

व्यवहारात भारुडाचा एक अर्थ ..........................................................असाही आहे.

1. व्यावहारिक शिक्षण देणे
2. कंटाळवाणी व निरर्थक बडबड
3. गीतगायन करणे
4. मनोरंजन करणे

**Options :**
2268952698170. 1
2268952698171. 2
2268952698172. 3
2268952698173. 4

| | |
|---|---|
| **Sub-Section Number :** | 2 |
| **Sub-Section Id :** | 22689528805 |
| **Question Shuffling Allowed :** | No |

**Question Id : 226895695923 Question Type : COMPREHENSION Sub Question Shuffling Allowed : Yes Group Comprehension Questions : No Question Pattern Type : NonMatrix**
**Question Numbers : (980 to 983)**

**राग**

एकदा एके ठिकाणी एक गृहस्थ ध्यान करत बसलेला असतो. आपल्या मनाची एकाग्रता साधण्याचा तो प्रयत्न करत असतो. बाजूलाच एक छोटी मुलगी खेळत असते. तिच्या आवाजामुळे आणि गोंधळामुळे त्या व्यक्तीला त्रास होतो. त्याच्या ध्यानात त्यामुळे अडथळा निर्माण होतो. तो व्यक्ती उठतो आणि त्या मुलीला मारायला सुरुवात करतो. हे दृश्य बघून जवळच असणारा एक बौद्ध भिक्षू त्या मुलीला बाजूला करतो. त्या माणसाचा राग मात्र कमी झालेला नसतो. तो माणूस त्या मुलीला सोडून त्या बौद्ध भिक्षूला काठीने मारायला सुरुवात करतो. बौद्ध भिक्षू मात्र अशा परिस्थितीत कुठलीही प्रतिक्रिया देत नाही व निमुटपणे काठीचा मार सहन करतो. थोड्या वेळाने राग कमी झाल्यावर तो माणूस शांत होतो. आता मात्र बौद्ध भिक्षू त्या माणसाला विचारतो की, "तू मला का मारले?" तेव्हा तो माणूस सांगतो की, "मुलीने माझ्या ध्यानात अडथळा निर्माण केल्यामुळे मला राग आला होता. यात तुमची काही चूक नाही. चूक मात्र सर्वस्वी त्या मुलीचीच होती." पुढे भिक्षू विचारतात, "मग तू आता मारायचे का थांबवलेस?" त्यावर ती व्यक्ती उत्तर देते की, "आता माझा राग राहिला नाही."

याचाच अर्थ असा होतो की, राग आल्यानंतर माणसाचा त्याच्या विचारांवरचा व मनावरचा ताबा सुटतो. राग हा अग्नीसारखा असतो. रागाची तीव्रता जेवढी जास्त तेवढा त्याचा भडका जास्त होतो. माणसाने आपल्या रागाची जबाबदारी स्वतःकडे घेणे गरजेचे असते, कारण त्याची निर्मिती स्वतःच्या आतमध्येच होत असते. माणूस मात्र आपल्या मनाच्या अज्ञानामुळे इतर लोकांना, परिस्थितीला आपल्या रागास जबाबदार ठरवत असतो. आपल्या विचार, भावना व वर्तन यांच्यावर निरीक्षण करायची सवय लावून घेतल्यास आपल्या भावनांना आपणच जबाबदार असतो हे माणसाला समजते.

जोपर्यंत माणूस आपल्या अहंकाराला जपण्याचा प्रयत्न करतो, त्याला कुरवाळतो, त्याची काळजी घेतो, तोपर्यंत तो अहंकार वाढत जातो व त्यातूनच सर्व समस्या निर्माण होत असतात. अहंकारच माणसाच्या रागाचे मूळ कारण असते. अहंकारातून माणसाला तात्कालिक सुख मिळत असते.

**Sub questions**

**Question Number : 980 Question Id : 226895695924 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

गृहस्थाने मुलीला मारण्याचे कारण -

1. त्याच्या ध्यानात अडथळा निर्माण झाल्यामुळे
2. बौद्ध भिक्षूने प्रश्न विचारल्यामुळे
3. सहज मनात आल्यामुळे
4. आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी

**Options :**
2268952698174. 1
2268952698175. 2
2268952698176. 3
2268952698177. 4

**Question Number : 981 Question Id : 226895695925 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

माणसाला राग आल्यानंतर नेमके काय होते?

1. आनंद होतो.
2. विचार व मन यावरील नियंत्रण सुटते.
3. मनात सकारात्मक विचार निर्माण होतात.
4. मनात योग्य निर्णयक्षमता निर्माण होते.

**Options :**
2268952698178. 1
2268952698179. 2
2268952698180. 3
2268952698181. 4

**Question Number : 982 Question Id : 226895695926 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

आपण आपल्या रागासाठी इतरांना कशामुळे जबाबदार ठरवतो?

1. आपल्या मनाचे अज्ञान
2. आपल्या रागासाठी इतर लोकच जबाबदार आहेत ही प्रबळ भावना
3. इतर लोकांबद्दल असणारी तीव्र चीड
4. इतर लोकांबद्दल असणारा मत्सर भाव व आजूबाजूची परिस्थिती

**Options :**
2268952698182. 1
2268952698183. 2
2268952698184. 3
2268952698185. 4

**Question Number : 983 Question Id : 226895695927 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

मनुष्याच्या रागाचे मूळ कारण कोणते?

1. असत्य वर्तन
2. मनुष्यातील अहंकार
3. इतर लोक
4. सकारात्मक विचारसरणी

**Options :**
2268952698186. 1
2268952698187. 2
2268952698188. 3
2268952698189. 4

| | |
|---|---|
| **Sub-Section Number :** | 3 |
| **Sub-Section Id :** | 22689528806 |
| **Question Shuffling Allowed :** | No |

**Question Id : 226895695928 Question Type : COMPREHENSION Sub Question Shuffling Allowed : Yes Group Comprehension Questions : No Question Pattern Type : NonMatrix**
**Question Numbers : (984 to 987)**

## इस्राईलमधील मोशाव

इस्राईलमध्ये शेती ही सहकारी पद्धतीने केली जाते. त्याला येथे मोशाव असे म्हणतात. मोशाव म्हणजे सहकारी गाव. मोशावमधील प्रत्येक सभासदाला जमीन भाडेपट्ट्याने दिली जाते. 'फार योशोवा' या मोशाव मध्ये प्रत्येक सभासदाला ८० ड्यूनम म्हणजे २० एकर जमीन ४९ वर्षांच्या कराराने देण्यात आली आहे. ह्या पद्धतीत पिकांची लागवड करणे, दुभती गुरे पाळणे, कोंबड्या पाळणे या गोष्टी वैयक्तिक पातळीवर केल्या जातात. परंतु उत्पादन झालेल्या मालाची विक्री मात्र सहकारी पद्धतीनेच करावी लागते. त्यामुळे भाजीपाला, धान्य, फळे, दूध व अंडी या मालाची विक्री मोशाव मधील सहकारी संघटना करते. वैयक्तिकरित्या कोणत्याही शेतकऱ्याला आपल्या शेतमालाची विक्री करता येत नाही. तसेच गुरांचे खाद्य, मुरघास, खते, बियाणे, यंत्रसामग्री या गोष्टी आपल्या सभासदाला पुरविण्याचे कार्य मोशाव मधील सहकारी संघटना करते.

इस्राईलमध्ये जमीन व पाणी हे राष्ट्राच्या मालकीचे आहे. या दोन गोष्टी अत्यंत दुर्मिळ असल्याने त्यांचा उपयोग फार काळजीपूर्वकरित्या करावा लागतो. इस्राईलच्या उत्तर भागात जो पाऊस पडतो तो त्यांनी किनरेट नावाच्या तलावात अत्यंत काळजीपूर्वकरित्या साठवला आहे. तेथून हे पाणी राष्ट्राच्या सर्व शेतीला पुरविले जाते. त्यासाठी त्यांनी लोखंडी नळ टाकले आहेत व त्याला 'राष्ट्रीय जलवाहिनी' असे नाव दिले आहे. या नळातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतावर पोहोचविण्याची व्यवस्था केली आहे. शेतकरी हे पाणी फवारा पद्धतीने किंवा ठिबक पद्धतीने आपल्या पिकांना देतात. या पद्धतीमुळे पाणी अत्यंत काटकसरीने वापरता येते. पिकांना लागणारी खते द्रव रूपाने देण्याची सोय झाल्यामुळे ती फवारा किंवा ठिबक पद्धतीने दिल्या जाणाऱ्या पाण्यातूनच दिली जातात. पाणी ही दुर्मिळ वस्तू असल्याने जी पिके जास्त उत्पन्न देतील, अशीच पिके या पाण्यावर लावली जातात.

प्रत्येक मोशावमध्ये कृषिसल्लागार असतात. या सल्लागारांचा संशोधन केंद्रे व विक्री संघटना यांच्याशी घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे ते शेतीतील अद्ययावत संशोधन मोशावमधील शेतीत आणून रुजवितात. त्यामुळे मोशावमधील उत्पादन सतत वाढत असते. येथे ऑलीव्हची फळे मिठाच्या पाण्यात ठेवून त्याचा खारंबा सारखा उपयोग करतात. ऑलीव्हच्या एका झाडापासून १०० किलो फळे उत्पादन करण्याचा विक्रम इस्राईलने केला आहे. हे उत्पादन येण्याची प्रमुख कारणे ठिबक पद्धतीने दिल्या जाणाऱ्या पाण्यातून ह्या झाडाला लागणाऱ्या जीवन द्रव्याचा नियमितपणे पुरवठा, फळे न येणाऱ्या फांद्यांची नियमित छाटणी व फळे येणाऱ्या फांद्यांच्या तळाशी वर्तुळाकार साल काढणे ही आहेत.

मोशावमधील केळाची लागवडही वैशिष्ट्यपूर्ण आहे. केळीच्या झाडावरील प्रत्येक लोंगर निळ्या रंगाच्या प्लास्टिक कागदाने झाकला जातो. असे केल्याने लोंगरातील फळे सारखी पिकतात व त्यांना आकर्षक रंग येतो. इस्राईलमध्ये हल्ली फळझाडांची दाट लागवड पद्धती अनुसरली जाते. पूर्वी जेथे ४० ते ५० झाडे लावली जात, तेथे हल्ली एकरी २०० ते २५० झाडे लावली जातात. दाट लागवडीमुळे उत्पन्न लवकर मिळते. ज्या झाडांना फळे कमी लागतात अशा झाडांच्या फांद्या छाटल्या जातात व ती झाडे कालांतराने काढून टाकतात.

**Sub questions**

**Question Number : 984 Question Id : 226895695929 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

इस्राईलमधील 'मोशाव' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे?

1. पाणी पुरवठा योजना
2. सहकारी शेती करणारे सहकारी गाव
3. अल्पभूधारक शेतकरी
4. विस्तृत शेती असणारा शेतमालक

**Options :**
2268952698190. 1
2268952698191. 2
2268952698192. 3
2268952698193. 4

**Question Number : 985 Question Id : 226895695930 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

इस्राईलमध्ये मोशावमधील शेतीतील उत्पादित मालाची विक्री करणे व त्यासाठी आवश्यक खते, बी- बियाणे पुरविण्याचे कार्य कोणामार्फत केले जाते ?

1. वैयक्तिकरित्या शेतकऱ्यामार्फत
2. सावकारामार्फत
3. मोशावमधील सहकारी संघटनेमार्फत
4. बी-बियाणे पुरविणाऱ्या कंपनीमार्फत

**Options :**
2268952698194. 1
2268952698195. 2
2268952698196. 3
2268952698197. 4

**Question Number : 986 Question Id : 226895695931 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

इस्राईलमधील 'राष्ट्रीय जलवाहिनी' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे?

1. राष्ट्राच्या सर्व शेतीला नळाद्वारे पाणीपुरवठा करणे.
2. ठराविक भागासाठी पाणीपुरवठा करणे.
3. पाझर तलावांची बांधणी करणे.
4. धरण निर्मितीतून पाणी अडविणे.

**Options :**
2268952698198. 1
2268952698199. 2
2268952698200. 3
2268952698201. 4

**Question Number : 987 Question Id : 226895695932 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

इस्राईलमध्ये फळझाडांची दाट लागवड करण्याचे प्रमुख कारण कोणते?

1. दाट लागवडीमुळे अधिक सावली मिळते.
2. दाट लागवडीमुळे पक्षांचा शिरकाव होत नाही.
3. दाट लागवडीमुळे उत्पन्न लवकर मिळते.
4. दाट लागवडीमुळे खते जास्त लागत नाही.

**Options :**
2268952698202. 1
2268952698203. 2
2268952698204. 3
2268952698205. 4

| | |
|---|---|
| **Sub-Section Number :** | 4 |
| **Sub-Section Id :** | 22689528807 |
| **Question Shuffling Allowed :** | Yes |

**Question Number : 988 Question Id : 226895695933 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढील वाक्प्रचाराचा योग्य अर्थ असणारा पर्याय ओळखा.

अपराध पोटात घेणे -

1. अपराध्यास शिक्षा देणे
2. क्षमा करणे
3. दूर लोटणे
4. न्यायनिवाडा करणे

**Options :**
2268952698206. 1
2268952698207. 2
2268952698208. 3
2268952698209. 4

**Question Number : 989 Question Id : 226895695934 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा:

| **स्तंभ – I** | **स्तंभ - II** |
|---|---|
| A. वडाची साल पिंपळाला | I. विद्वान मनुष्याचा सर्वत्र गौरव होतो |
| B. विद्वान सर्वत्र पूज्यन्ते | II. ज्यांचा एकमेकांशी संबंध नाही अशा गोष्टी जुळवणे |
| C. सुतावरून स्वर्ग गाठणे | III. फुकट लाटलेले त्याच पद्धतीने जाणे |
| D. हपापाचा माल गपापा | IV. थोड्याशा पुराव्याच्या आधारे पूर्ण गोष्टीचा छडा लावणे |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A - III, B - I, C - II, D - IV
2. A - IV, B - III, C - I , D - II
3. A - II, B - I, C - IV, D - III
4. A - II, B - I , C - III, D - IV

**Options :**
2268952698210. 1
2268952698211. 2
2268952698212. 3
2268952698213. 4

**Question Number : 990 Question Id : 226895695935 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा:

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. पूर्णाभ्यस्त शब्द | I. राजाज्ञा |
| B. अंशाभ्यस्त शब्द | II. शेजारीपाजारी |
| C. अनुकरणवाचक शब्द | III. लाललाल |
| D. सामासिक शब्द | IV. सळसळ |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A-IV, B-I, C-II, D–III
2. A-I, B-IV, C-II, D-III
3. A-II, B-III, C-I, D-IV
4. A-III, B-II, C-IV, D–I

**Options :**
2268952698214. 1
2268952698215. 2
2268952698216. 3
2268952698217. 4

**Question Number : 991 Question Id : 226895695936 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

**विधान A** - काही शब्द संस्कृत भाषेतून मराठीत येताना त्यांच्या रुपात बदल होतो, त्यास 'तत्सम शब्द' असे म्हणतात.

**विधान B** - जे शब्द संस्कृत भाषेतून मराठी भाषेत जसेच्या तसे वापरले जातात, त्यास 'देशी शब्द' असे म्हणतात.

1. दोन्ही विधाने बरोबर आहेत.
2. दोन्ही विधाने चूक आहेत.
3. विधान A बरोबर, परंतु विधान B चूक आहे.
4. विधान A चूक, परंतु विधान B बरोबर आहे.

**Options :**
2268952698218. 1
2268952698219. 2
2268952698220. 3
2268952698221. 4

**Question Number : 992 Question Id : 226895695937 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पोर्तुगीज भाषेतील शब्द ओळखा.

A. बस

B. पगार

C. भाकरी

D. फणस

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा :

1. केवळ A आणि C
2. केवळ B आणि D
3. केवळ D
4. केवळ C

**Options :**
2268952698222. 1
2268952698223. 2
2268952698224. 3
2268952698225. 4

**Question Number : 993 Question Id : 226895695938 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.

| **स्तंभ – I** | **स्तंभ - II** |
|---|---|
| A. दुष्ट | I. कोरडे |
| B. दमट | II. खंडित |
| C. अनुकूल | III. प्रतिकूल |
| D. अभंग | IV. सज्जन |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा :

1. A - IV, B - II, C - III, D – I
2. A - IV, B - I, C - III, D – II
3. A - I , B - II , C - III, D – IV
4. A - II, B - I , C - IV, D – III

**Options :**
2268952698226. 1
2268952698227. 2
2268952698228. 3
2268952698229. 4

**Question Number : 994 Question Id : 226895695939 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

समानार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. शिवार | I. कष्ट |
| B. संमती | II. गती |
| C. श्रम | III. शेत |
| D. वेग | IV. अनुमती |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा :

1. A - IV, B - III, C - I, D – II
2. A - IV, B - I, C - III, D – II
3. A - III, B - IV, C - I, D – II
4. A - II, B - I, C - IV, D – III

**Options :**
2268952698230. 1
2268952698231. 2
2268952698232. 3
2268952698233. 4

**Question Number : 995 Question Id : 226895695940 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

संख्याविशेषण ओळखा.

A. दहा रुपये

B. गोड फळे

C. पुष्कळ माणसे

D. तो बगीचा

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. केवळ A आणि C
2. केवळ B आणि D
3. केवळ A
4. केवळ C

**Options :**
2268952698234. 1
2268952698235. 2
2268952698236. 3
2268952698237. 4

**Question Number : 996 Question Id : 226895695941 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा: विशेषण आणि विशेष्य

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. चांगली | I. कुत्रा |
| B. काळा | II. रान |
| C. हिरवे | III. टोप्या |
| D. पाच | IV. माती |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A - IV, B - III, C - I, D – II
2. A - II, B - III, C - IV, D – I
3. A - IV, B - III, C - II, D – I
4. A - IV, B - I, C - II, D – III

**Options :**
2268952698238. 1
2268952698239. 2
2268952698240. 3
2268952698241. 4

**Question Number : 997 Question Id : 226895695942 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढील पर्यायांतून पंचमी विभक्तीचे प्रत्यय ओळखा.

A. ऊन

B. स, ला, ना, ते,

C. हून

D. त, ई, आ

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. केवळ A आणि C
2. केवळ A आणि D
3. केवळ C
4. केवळ D

**Options :**
2268952698242. 1
2268952698243. 2
2268952698244. 3
2268952698245. 4

**Question Number : 998 Question Id : 226895695943 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढे दोन विधाने दिलेली आहेत

**विधान I:** वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात, त्यांना कारकार्थ असे म्हणतात.

**विधान II:** वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेले जे संबंध असतात, त्या संबंधांना उपपदार्थ असे म्हणतात.

या दोन विधानांच्या आधारे अचूक पर्याय निवडा:

1. दोन्ही विधाने बरोबर आहेत.
2. दोन्ही विधाने चूक आहेत.
3. विधान I बरोबर, परंतु विधान II चूक आहे.
4. विधान I चूक, परंतु विधान II बरोबर आहे.

**Options :**
2268952698246. 1
2268952698247. 2
2268952698248. 3
2268952698249. 4

**Question Number : 999 Question Id : 226895695944 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता असते त्यास ........................ म्हणतात.

1. अकर्मक क्रियापद
2. सकर्मक क्रियापद
3. कर्मणी प्रयोग
4. कर्तरी प्रयोग

**Options :**
2268952698250. 1
2268952698251. 2
2268952698252. 3
2268952698253. 4

**Question Number : 1000 Question Id : 226895695945 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

आजीने नातीला गोष्ट सांगितली, या वाक्यातील क्रियापद ओळखा.

1. आजीने
2. नातीला
3. गोष्ट
4. सांगितली

**Options :**
2268952698254. 1
2268952698255. 2
2268952698256. 3
2268952698257. 4

**Question Number : 1001 Question Id : 226895695946 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा:

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. शब्दयोगी अव्यय | I. अरेरे, बापरे |
| B. उभयान्वयी अव्यय | II. आणि, म्हणून |
| C. केवलप्रयोगी अव्यय | III. वर, पासून |
| D. क्रियापद | IV. होते, जातो |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A - IV, B - III, C - II, D – I
2. A - I, B - III, C - II, D – IV
3. A - III, B - II, C - I, D – IV
4. A - I, B - III, C - IV, D – II

**Options :**
2268952698258. 1
2268952698259. 2
2268952698260. 3
2268952698261. 4

**Question Number : 1002 Question Id : 226895695947 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

एकमेकांशेजारी येणारे वर्ण जर स्वर असतील, तर त्यांच्यातील संधीस ........................................ असे म्हणतात.

1. स्वरसंधी
2. विसर्गसंधी
3. व्यंजनसंधी
4. अनुनासिके

**Options :**
2268952698262. 1
2268952698263. 2
2268952698264. 3
2268952698265. 4

**Question Number : 1003 Question Id : 226895695948 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा:

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. अव्ययीभाव समास | I. दुसरे पद प्रधान |
| B. तत्पुरुष समास | II. पहिले पद प्रधान |
| C. द्वंद्व समास | III. दोन्ही पदे प्रधान |
| D. बहुव्रीही समास | IV. दोन्ही पदांऐवजी तिसऱ्याच पदाचा बोध होणे |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A - IV, B - III, C - II, D – I
2. A - I, B - III, C - IV, D – II
3. A - II, B - III, C - I, D – IV
4. A - II, B - I, C - III, D – IV

**Options :**
2268952698266. 1
2268952698267. 2
2268952698268. 3
2268952698269. 4

**Question Number : 1004 Question Id : 226895695949 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा:

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. अनुप्रास अलंकार | I. सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो |
| B. यमक अलंकार | II. कर्णासारखा दानशूर कर्णच |
| C. श्लेष अलंकार | III. घेती झेप घळीतुनी खळखळा फेसाळले ओहळ |
| D. अनन्वय अलंकार | IV. हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस. |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A-I, B-II, C-III, D-IV
2. A-III, B-I, C-IV, D -II
3. A -II, B -I, C -III, D –IV
4. A -IV, B -II, C -III, D –I

**Options :**
2268952698270. 1
2268952698271. 2
2268952698272. 3
2268952698273. 4

**Question Number : 1005 Question Id : 226895695950 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

योग्य क्रम ओळखा.

A. पाकळ्या उमलल्या सरोजांतील

B. न हे वदन

C. न हे नयन

D. चंद्रमा शरदिचा गमे केवळ

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A, B, C, D
2. A, C, B, D
3. B, A, D, C
4. C, A, B, D

**Options :**
2268952698274. 1
2268952698275. 2
2268952698276. 3
2268952698277. 4

**Question Number : 1006 Question Id : 226895695951 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढील उदाहरण कोणत्या रसाचे आहे ते सांगा.

घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला.

1. वीररस
2. रौद्ररस
3. शांतरस
4. हास्यरस

**Options :**
2268952698278. 1
2268952698279. 2
2268952698280. 3
2268952698281. 4

**Question Number : 1007 Question Id : 226895695952 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढे दोन विधाने दिलेली आहेत:

**विधान I:** नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे की स्त्रीजातीची आहे की दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही, असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे लिंग असे म्हणतात.

**विधान II :** रुमाल हा शब्द स्त्रीलिंगी आहे.

या दोन विधानांच्या आधारे अचूक पर्याय निवडा:

1. दोन्ही विधाने बरोबर आहेत.
2. दोन्ही विधाने चूक आहेत.
3. विधान I बरोबर, परंतु विधान II चूक आहे.
4. विधान I चूक, परंतु विधान II बरोबर आहे.

**Options :**
2268952698282. 1
2268952698283. 2
2268952698284. 3
2268952698285. 4

**Question Number : 1008 Question Id : 226895695953 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा :

| **स्तंभ – I** | **स्तंभ - II** |
|---|---|
| **( एकवचन )** | **( अनेकवचन )** |
| A. पक्षी | I. रस्ते |
| B. रस्ता | II. पक्षी |
| C. दिवा | III. चांदण्या |
| D. चांदणी | IV. दिवे |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा :

1. A -I, B -II, C -IV, D –III
2. A -I, B -II, C -III, D –IV
3. A -II, B -I, C -IV, D –III
4. A -I, B -III, C -II, D –IV

**Options :**
2268952698286. 1
2268952698287. 2
2268952698288. 3
2268952698289. 4

**Question Number : 1009 Question Id : 226895695954 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढील शब्दसमूहासाठी योग्य पर्याय ओळखा.

कधीही पराभूत न होणारा -

1. अमर
2. अजातशत्रू
3. अजिंक्य
4. अतिथी

**Options :**
2268952698290. 1
2268952698291. 2
2268952698292. 3
2268952698293. 4

**Question Number : 1010 Question Id : 226895695955 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढील शब्दसमूहासाठी योग्य पर्याय ओळखा.

जमिनीवर आणि पाण्यात राहू शकणारा -

1. उदयोन्मुख
2. उत्तरायण
3. उपनगर
4. उभयचर

**Options :**
2268952698294. 1
2268952698295. 2
2268952698296. 3
2268952698297. 4

**Question Number : 1011 Question Id : 226895695956 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा: समूहदर्शक शब्द

| **स्तंभ – I** | **स्तंभ - II** |
|---|---|
| A. धान्याची | I. पथक |
| B. सैनिकांचे | II. गुच्छ |
| C. फुलांचा | III. संघ |
| D. खेळाडूंचा | IV. रास |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A -II, B –IV, C -I, D -III
2. A -I, B –IV, C -II, D -III
3. A -IV, B –I, C -II, D -III
4. A -II, B –I, C -III, D -IV

**Options :**

2268952698298. 1
2268952698299. 2
2268952698300. 3
2268952698301. 4

**Question Number : 1012 Question Id : 226895695957 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

'उपचार' या शब्दाचा योग्य अर्थ दर्शविणारा पर्याय ओळखा.

A. उपाय

B. उगवण

C. चिकित्सा

D. थारा

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. केवळ A आणि C
2. केवळ A आणि D
3. केवळ A
4. केवळ B

**Options :**
2268952698302. 1
2268952698303. 2
2268952698304. 3
2268952698305. 4

**Question Number : 1013 Question Id : 226895695958 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

'गळ' या शब्दाचा योग्य अर्थ स्पष्ट करणारा पर्याय ओळखा.

1. मासे पकडण्यासाठी वापरात येणारे साधन
2. धान्याचा साठा
3. भांडार
4. शेतीचा सारा

**Options :**
2268952698306. 1
2268952698307. 2
2268952698308. 3
2268952698309. 4

**Question Number : 1014 Question Id : 226895695959 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील वाक्यातील अशुद्ध शब्द ओळखा.

विद्यार्थ्यांसाठी गुरूंचे आशिरवाद महत्त्वाचे असतात.

1. विद्यार्थ्यांसाठी
2. आशिरवाद
3. महत्त्वाचे
4. गुरूंचे

**Options :**
2268952698310. 1
2268952698311. 2
2268952698312. 3
2268952698313. 4

**Question Number : 1015 Question Id : 226895695960 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील काव्यपंक्तीतील काव्यगुण ओळखा.

हे मंदमंद पद सुंदर कुंददंती, चाले जसा मद-धुरंधर इंद्रदंती

1. प्रसाद गुण
2. ओज गुण
3. माधुर्य गुण
4. कांती गुण

**Options :**
2268952698314. 1
2268952698315. 2
2268952698316. 3
2268952698317. 4

**Question Number : 1016 Question Id : 226895695961 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील व्याख्येचा योग्य क्रम ओळखा.

A. वाच्यार्थ असे म्हणतात

B. व्यक्त

C. अभिधा शक्तीच्या साह्याने

D. होणाऱ्या अर्थाला

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A, B, C, D
2. A, C, B, D
3. B, A, D, C
4. C, B, D, A

**Options :**
2268952698318. 1
2268952698319. 2
2268952698320. 3

2268952698321. 4

**Question Number : 1017 Question Id : 226895695962 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

पुढे दोन विधाने दिलेली आहेत:

**विधान I:** 'मृत्युंजय' या कादंबरीचे लेखक शिवाजी सावंत हे आहेत.

**विधान II:** 'छावा' या कादंबरीचे लेखक विश्वास पाटील हे आहेत.

या दोन विधानांच्या आधारे अचूक पर्याय निवडा:

1. दोन्ही विधाने बरोबर आहेत.
2. दोन्ही विधाने चूक आहेत.
3. विधान I बरोबर, परंतु विधान II चूक आहे.
4. विधान I चूक, परंतु विधान II बरोबर आहे.

**Options :**
2268952698322. 1
2268952698323. 2
2268952698324. 3
2268952698325. 4

**Question Number : 1018 Question Id : 226895695963 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील निबंध लेखनाचा विषय हा कोणत्या निबंधलेखन प्रकारात येईल ते सांगा.

'मी पाहिलेला रायगड'

1. कल्पनात्मक निबंध
2. वर्णनात्मक निबंध
3. वैचारिक निबंध
4. आत्मकथनात्मक निबंध

**Options :**
2268952698326. 1
2268952698327. 2
2268952698328. 3
2268952698329. 4

**Question Number : 1019 Question Id : 226895695964 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

तुमच्या मित्राला परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल तुम्ही त्याचे खालीलपैकी कोणत्या पत्राने अभिनंदन कराल ते सांगा.

1. निमंत्रण पत्र
2. मागणी पत्र
3. अभिनंदन पत्र
4. चौकशी पत्र

**Options :**
2268952698330. 1
2268952698331. 2
2268952698332. 3

2268952698333. 4

**Question Number : 1020 Question Id : 226895695965 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

जोड्या जुळवा: विरामचिन्हे

| स्तंभ – I | स्तंभ - II |
|---|---|
| A. ? | I. दुहेरी अवतरणचिन्ह |
| B. ! | II. प्रश्नचिन्ह |
| C. " " | III. अर्धविराम |
| D. ; | IV. उद्गारचिन्ह |

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A -II, B –IV, C -III, D –I
2. A -I, B –IV, C -II, D –III
3. A -II, B –I, C -IV, D –III
4. A -II, B –IV, C -I, D –III

**Options :**
2268952698334. 1
2268952698335. 2
2268952698336. 3
2268952698337. 4

**Question Number : 1021 Question Id : 226895695966 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील वाक्याचे योग्य होकारार्थी रूप ओळखा.

अपमान केल्यास कुणाला राग येत नाही?

1. अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतोच.
2. अपमान केल्यास कुणालाही राग येत नाही.
3. कुणाचाही अपमान करु नये.
4. अपमान केल्यास राग यायला हवा.

**Options :**
2268952698338. 1
2268952698339. 2
2268952698340. 3
2268952698341. 4

**Question Number : 1022 Question Id : 226895695967 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.

मुलाने बैलास मारले.

1. कर्तरी प्रयोग
2. कर्मणी प्रयोग
3. भावे प्रयोग
4. समापन कर्मणी प्रयोग

**Options :**
2268952698342. 1
2268952698343. 2
2268952698344. 3
2268952698345. 4

**Question Number : 1023 Question Id : 226895695968 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

खालील व्याख्येचा योग्य क्रम ओळखा.

A. वाक्यातील क्रियापदाच्या

B. केवळ काळाचा बोध होत असेल

C. तर त्याला स्वार्थी वाक्य म्हणतात

D. रूपावरून

पुढीलपैकी अचूक पर्याय निवडा:

1. A, B, C, D
2. B, A, C, D
3. A, D, B, C
4. C, B, D, A

**Options :**
2268952698346. 1
2268952698347. 2
2268952698348. 3
2268952698349. 4

**Question Number : 1024 Question Id : 226895695969 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

'उपरा' या पुस्तकाचे लेखक कोण ते सांगा.

1. लक्ष्मण माने
2. पु. ल. देशपांडे
3. आचार्य अत्रे
4. कुसुमाग्रज

**Options :**
2268952698350. 1
2268952698351. 2
2268952698352. 3
2268952698353. 4

**Question Number : 1025 Question Id : 226895695970 Question Type : MCQ Option Shuffling : No Display Question Number : Yes Is Question Mandatory : No**
**Correct Marks : 5 Wrong Marks : 1**

योग्य समानार्थी शब्द ओळखा.

गुरू

1. अगाध
2. आचार्य
3. आश्रयी
4. अमाप

**Options :**
2268952698354. 1
2268952698355. 2
2268952698356. 3
2268952698357. 4